## पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे - ३८.

(सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६०, नं. ११५३, दि ८/५/१९४२ आणि मुंबई पब्लिक ट्रस्ट ॲक्ट रजिस्टर नं. एफ् - ९९, दि. १५/१२/१९५२.)

# घटना

(मंडळाच्या दि. ६ नोव्हेंबर १९८२ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेत मंजूर व स्विकृत केलेली.)

**(१) नांव :**

संस्थेचे नांव "पूना डिस्ट्रिक्ट एज्युकेशन असोसिएशन, पुणे (पुणे जिल्हा शिक्षण मंडळ, पुणे" ) असे राहील व खालील विधी नियमात तिचा उल्लेख "असोसिएशन" (मंडळ) असा केला जाईल.

**(२) मुख्य कार्यालय :**

(नोंदणीकृत कार्यालय) : मंडळाचे मुख्य कार्यालय म्हणजेच नोंदणीकृत कार्यालय पुणे शहर हद्दीत राहील.

**(३) हेतु (ध्येय) व उद्दिष्ट्ये :** मंडळाची ध्येय व उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

(१) भारतातील नवीन पिढीला आणि प्रामुख्याने महाराष्ट्र राज्यातील पुणे जिल्ह्याच्या कक्षेत येणाऱ्या नवीन पिढीला शिक्षण देणे.

(२) शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी बालवाड्या सुरु करून त्या चालविणे व त्यांची व्यवस्था ठेवणे; प्रा. शाळा, माध्यमिक शाळा, तांत्रिक शिक्षण देणाऱ्या शाळा, व्यापारी विषयक, विज्ञान विषयक, शेती विषयक, कायदे विषयक आणि शारीरिक शिक्षण देणाऱ्या संस्था सुरु करणे.

(३) कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालये सुरू करणे व ती चालविणे.

(४) वसतीगृहे, क्रिडांगणे, ग्रंथालये वस्तुभांडारे व वाचनालये सुरू करून ती चालविणे. त्याचप्रमाणे संस्थेची ध्येय धोरण करण्यास उपयोगी व लाभदायक अशी शैक्षणिक शिबीरे भरविणे व व्याख्याने आयोजित करणे.

(५) सांस्कृतिक विकास व सहकार विषयक चळवळींच्या विकासाशी संबंधीत अशा गोष्टींकडे लक्ष पुरविण्यासाठी वेळोवेळी चर्चासत्रे व प्रदर्शने भरविणे .

(६) संस्थेच्या उद्दिष्टांच्या संवर्धनासाठी योग्य वाटणारी पुस्तके, नियत-कालिके, मासिके, पुस्तिका छापून प्रकाशित करणे व त्यांचे प्रदर्शन करणे. (प्रदर्शित करणे)

No.5511 ICT PUNE MENT OF INDIA

मुख्याध्यापक
बाबुरावजी घोलप माध्य. व उच्च माध्य. विद्यालय (व्यवसायक अभ्यासक्रम सह)
सांगवी, पुणे-२७

Scanned with ACE Scanner